H&RA
WESTERN INDIA
Estd : 1951

PUNYANAGARI

पुण्य नगरी

13.06.2023

# पर्यटनाला चालना देणाऱ्या शासनाच्या नवीन उपक्रमांचे एचआरएडब्ल्यूआयकडून स्वागत

**मुंबई** : हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया (एचआरएडब्ल्यूआय)ने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात, महाराष्ट्रातील पर्यटन क्षमतेला चालना देण्याची अपेक्षा असलेल्या राज्यभरातील विविध प्रकल्पांना जलद मंजुरी दिल्याबद्दल सरकारचे कौतुक केले आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी)तर्फे ३० हून अधिक आगामी मालमत्तांची भागीदारी यासह भंडारा येथील गोसेखुर्द येथील जल पर्यटन प्रकल्प, लोणावळ्याजवळील कार्ला येथील एमआयसीई केंद्र आणि चाणक्य सेंटर फॉर एक्सलन्स राज्याने अलीकडेच जाहीर केली आहे.

एचआरएडब्ल्यूआय सरकारने पर्यटन क्षमतेला चालना देण्याकरता घेतलेल्या पुढाकारांचे कौतुक केले आहे. नवीन प्रकल्पांमुळे राज्यातील पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्रात मिळणाऱ्या संधींबद्दल आशावाद वाटतो. सरकारचे दूरदर्शी विचार आणि नावीन्यपूर्ण कल्पना त्याचप्रमाणे सक्रिय प्रचारात्मक प्रयत्नांमुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटनाची भरभराट होईल. ही लवकरच विकसित होणारी स्थळे जगभरातील पर्यटकांना निःसंशयपणे भुरळ घालतील. महाराष्ट्राला जागतिक पर्यटन स्थळ बनवण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना पर्यटकांचा ओघ वाढवण्यासाठी सहाय्य करत आपणही उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे अत्यावश्यक ठरते. प्रस्तावित प्रकल्पांची पूर्तता करण्यासाठी एचआरएडब्ल्यूआयने राज्यातील अधिकाधिक हॉटेल विकासास प्रोत्साहन देण्यासाठी विशेष अनुदान सुरू करण्याची सरकारला विनंती केली आहे. यामुळे अधिकाधिक पर्यटकांना पर्यटन स्थळांपर्यंत पोहोचणे व्यवहार्य होईल, जेणेकरून पर्यटनाला चालना मिळेल, तसेच राज्यासाठी महसूलदेखील मिळेल, असे एचआरएडब्ल्यूआयचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी सांगितले. अंभोरा मंदिर विकासासाठी मांडलेल्या मौल्यवान सूचना, कोयना बामणोली येथे स्कूबा डायव्हिंग सेंटरची स्थापना, नागपुरातील सोनेगाव तलाव आणि सिंधुदुर्गातील गजबा देवी मंदिराचे सौंदर्यीकरण प्रकल्पांचेही एचआरएडब्ल्यूआयने खूप कौतुक केले आहे.

एचआरएडब्ल्यूआयचे उपाध्यक्ष चेतन मेहता म्हणाले की, महाराष्ट्रातील पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने आगामी प्रकल्प आणि उपक्रमांबद्दल आम्ही उत्सुक आहोत. पर्यटनाला चालना दिल्याने पर्यटकांची संख्या वाढेल आणि वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी खोलीची क्षमता वाढवणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात सुमारे ३,४०,००० खोल्या आहेत आणि प्रस्तावित प्रकल्पांच्या संख्येसह आम्हाला हॉटेल खोल्यांच्या क्षमतेच्या किमान दुप्पट आवश्यक असतील. विशिष्ट पर्यटन स्थळांवर हॉटेल स्थापन करण्यासाठी अनुदान, पर्यावरणपूरक हॉटेलसाठी प्रोत्साहन आणि वीज सबसिडी, आदरातिथ्य क्षेत्राच्या वाढीसाठी आवश्यक चालना देईल. शिवाय, पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राचा भारतातील रोजगार निर्मितीमध्ये मोठा वाटा आहे. टूरिझम सॅटेलाइट अकाऊंट (टीएसए) अनुसार, या क्षेत्रात ७९.८६ दशलक्ष प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या आहेत, ज्यांचा २०१९-२०२० मध्ये रोजगार निर्मितीत १५.३४ टक्के वाटा आहे. या नवीन प्रकल्पांमुळे आम्हाला रोजगाराच्या संधींमध्ये आणखी वाढ होण्याची अपेक्षा वाटते. ज्यामुळे उद्योग आणि कर्मचारी या दोघांनाही फायदा होईल, असेही त्यांनी म्हटले.